राजीनामा मंजूरीबाबत.
श्री.आशिष गुलाब ताजणे, आरोग्य सेवक (पुरुष), उपकेंद्र-खांबा, प्राथमिक आरोग्य केंद्र- चंदनापुरी, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र आरोग्य/आस्था-३/९२४ /२०२६
अहिल्यानगर, दिनांक -०१ / १० /२०२६

वाचा :- १. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/८, दिनांक- ०२ डिसेंबर १९९७
२. वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र- चंदनापुरी, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर यांचेकडील पत्र क्र. प्राआकें/आस्था/४३२/२०२६, दिनांक- २७/०८/२०२६
३. श्री.आशिष गुलाब ताजणे, आरोग्य सेवक, यांचे दिनांक- २७/०८/२०२६ रोजीचे राजीनामा पत्र.
४.महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम १९८२ मधील नियम ४६ (१)

ज्या अर्थी, श्री.आशिष गुलाब ताजणे, आरोग्य सेवक (पुरुष), उपकेंद्र-खांबा, प्राथमिक आरोग्य केंद्र- चंदनापुरी, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर यांची चंद्रपुर जिल्हा परिषद येथे शिक्षण सेवक या पदावर निवड झाली असल्याने राजीनामा मंजूरीबाबत अर्जाचा प्रस्ताव संदर्भ क्र.२ चे पत्रान्वये इकडेस सादर केला आहे. संदर्भ क्र.३ नुसार श्री.ताजणे, यांनी तांत्रिक बाब / औपचारीक म्हणून राजीनामा स्वीकारणेबाबत अर्ज सादर केलेला आहे.

त्या अर्थी, मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन चंद्रपुर जिल्हा परिषद येथे शिक्षण सेवक या पदावर निवड झाली असल्याने राजीनामा तांत्रिक / औपचारीक बाब म्हणून मंजूर करीत असून चंद्रपुर जिल्हा परिषद येथे शिक्षण सेवक या पदावर हजर होणेकामी आदेशाचे दिनांकापासून कार्यमुक्त करीत आहे.

सदरच्या आदेशाची नोंद श्री.आशिष गुलाब ताजणे, आरोग्य सेवक, यांचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेला असुन त्याचा सांकेतांक क्रमांक------------------------------------------२०२६१००११००१२४ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 01-10-2026 18:26:58
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.आशिष गुलाब ताजणे, आरोग्य सेवक,

व्दारा :- वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र- चंदनापुरी, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर

प्रत :- वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र- चंदनापुरी, ता.संगमनेर, यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी

प्रत :- माहितीस्तव व पुढील कार्यवाहीसाठी

१. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर
२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर, जि.अहिल्यानगर
३. तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर
४. निवड नस्ती आरोग्य विभाग

स्वाक्षरी/-
(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर